ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू निष्ठावंत मुस्लिम सैनिक.



वामन रामराव वैद्य
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि. जालना, महाराष्ट्र

आपल्या देशात दोन प्रकारच्या विचारधारा आहेत. एक पुरोगामी आणि दुसरी प्रतिगामी पुरोगामी विचारधारेने समाजपरिवर्तन करून समता प्रस्थापित करण्याचा अनेक राजेमहाराजे यांनी प्रयत्न केला. त्यापैकीच छत्रपती शिवाजी महाराज होते. आज शिवाजीराजे म्हटले की हिंदूमुस्लीम विरुद्ध चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. शिवराय हे मुस्लिमांचे शत्रू नव्हते इस्लाम धर्माचे ही शत्रू नव्हते ते धर्मसहिष्णू होते. अनेक किल्ल्यावर मशिदीची व्यवस्था शिवाजीराजांनी केल्याचे दिसून येते. शिवाजीराजे शत्रू होते पण ते अन्यायाचे, अत्याचारी प्रवृत्तीचे शत्रू होते.

ज्यावेळी स्वकीयांनी शिवाजी राजावर तलवारी उपसल्या तेंव्हा ते वार वीर मुस्लिमांनी आपल्या छातीवर घेतले. हा इतिहास आपल्याला कोणी शिकवीत नाही ,उलट चुकीचा आणि विकृत इतिहास लिहून हिंदूमुस्लिम असा संघर्ष तेवत ठेवण्याचा इथल्या प्रतिगाम्यांचा डाव आहे. या देशात एकता नांदावी, समता नांदावी, अखंडता टिकावी म्हणून शिवाजी महाराजांचे खरे स्वरूप जाणून घेऊन त्याप्रमाणे वागले तरच देशात एकता आणि अखंडता टिकेल. शिवरायांचे खरे स्वरूप सर्वसामान्यांना कळावे हेच या लेखातून सांगायचे आहे.यामुळे आपापसात भांडणाऱ्या बहुजन समाजाची विस्कटलेली मनी एक होतील.

शिवाजी राजांना आपल्या आयुष्यात स्वकीया बरोबर ८० लढाया कराव्या लागल्या. मुस्लिमां बरोबर फक्त २० लढाया कराव्या लागल्या. जेव्हा मुस्लिमांना कळाले शिवाजी राजे भोसले मुस्लीमांच्या विरोधी नाहीत. तेव्हा अनेक मुस्लीम शिवाजी राजांची चाकरी करण्याकरता आले, आणि त्यांनी स्वराज्याची चाकरी स्वीकारली.

१) **सिद्धी हिलाल:-**घोडदळातील सेनापती (सहाय्यक) पन्हाळगडाच्या वेढ्यातून शिवाजीच्या सुटकेसाठी युद्ध केले. २ मार्च १६६०, उमराणी जवळ बहलोलखानाशी लढा दिला. बहलोलखान शरण आला.१५ एप्रिल १६७३.

२) **सिद्धी वाह वाह:-** सिद्दी हिलाल चा पुत्र घोडदळातील सरदार सिद्धी जोहार शी लढताना जखमी झाला व त्याला कैद झाली. (२ मार्च १६६७.

३) **सिद्धी इब्राहिम:-** शिवरायांचा खास अंगरक्षक, एक हजारी लष्कराचा प्रमुख व फोंड्याचा किल्लेदार होता. अफजल खानाच्या भेटीच्या वेळी शिवरायांचा अंगरक्षक म्हणून त्याला कामगिरी दिली होती. ( १० एप्रिल १६५९.) तसेच सुरुंग लावून फोंड्याचा किल्ला घेतला होता (५ एप्रिल १६७५ ) फोंड्याच्या किल्ल्यावर स्वराज्याचे निशाण लावले होते.

४) **नुर बेग:-** स्वराज्याचा पहिला सरनोबत त्याची नियुक्ती २१ मार्च १६५७ .रोजी झाली होती. स्वराज्याचा पहिला सरनोबत असून जवळजवळ सव्वालाख सैन्याचा सर्वोच्च अधिकारी होता.

५) **मदारी मेहतर:-** विश्वासू सेवक आग्रा भेटीच्या वेळी शिवरायांना पळून जाण्यासाठी मदत केली. एवढेच नव्हे तर स्वतः शिवाजीराजांच्या जागेवर झोपला. त्याला माहीत होते की आपल्याला पकडणार, मारणार तरी तो मागे हटला नाही हीच त्यांची स्वामीनिष्ठा होय.

६) **काझी हैदर:-** शिवरायांचा वकील, सचिव, खास सचिव असून फारसी पत्रलेखक होता. इ.स.१६७० ते १६७३ पर्यंत वकील म्हणून काम पाहिले.

७) **शमाखान:-** हा सरदार होता इतर सरदारांसह कोंढाणा हाती येताच मोगलांची किल्ले ठाणी जिंकून घेतली (फेब्रुवारी १६७०.)

८) **सिद्दी अंबर वहाब:-**हवालदार जुलै १६४७ साली कोंढाणा घेण्याचे फार मोठे श्रेय त्याला जाते.

९) **हुसेन मियांना:-** लष्करातील अधिकारी मसूद खानाच्या प्रांतावर हल्ला केला व उध्वस्त केला. बिळणी, जमखंडी धारवाड जिंकले. (मार्च १६७९)

१०) **रुस्तमेजमान:-** शिवाजी राजांचा खास मित्र होता. विजापूरच्या गुप्त बातम्या पाठवण्याचे हुबळीच्या लुटीत साहाय्य केले.(६ जानेवारी १६६५) नेताजी पालकरास मदत केली. १८ मार्च १६६३) सिद्धी मसूद चालून येताच शिवाजी राजांना सावध केले.

११) **दर्यासारंग :-**आरमारातील पहिला सुभेदार खांदेरीवर विजय (१६७८) बसरूर लुटले.

१२) **इब्राहिमखान :-**आरमारातील अधिकारी बसनूरच्या लढ्यामध्ये महत्त्वाचा सहभाग.

१३) **दौलत खान:-**आरमार प्रमुख सुभेदार उंदेरीवर हल्ला (२६ जानेवारी १६८०. खांदेरी लढ्यात पराक्रम (१६७८) सिद्धी शंभू चा पराभव (४ एप्रिल १६७४)

१४) **सिद्धी मिस्त्री-** आरमारातील अधिकारी होता वरील दर्यासारंग बरोबर सर्व लढायांमध्ये त्याने सहभाग घेतला होता.

१५) **मुलतान खान:-**आरमाराचा सुभेदार म्हणून शिवाजीच्या वेळी नौदलात अधिकारी म्हणून होता. (१६८१ मध्ये सुभेदार होता.)

१६) **दाऊद खान:-**आरमाराचा सुभेदार असून आरमारी लढायात सहभागी होता. सुलताना नंतर सुभेदार झाला पोर्तुगीजांकडून दारुगोळा मिळविला.

१७) **इब्राहीम खान:-**तोफखान्याचा प्रमुख होता डोंगरी किल्ल्याच्या लढाईमध्ये तोफखाण्यासह कर्तबगारी सिद्ध केली.

१८) **विजापूर व गोवळकोंडा वरून स्वराज्यात आलेले ७०० पठाण:-** या पाठांणामध्ये काही पायदळातील सैनिक असून काही घोडदळातील सैनिक होते.१६५८ पासून स्वराज्य सेवा निष्ठापूर्वक केली बेईमान कोणीही झाली नाही.

१९) घोडदळातील चार पथके मोगली चाकरी सोडून स्वराज्यात आली होती. घोडदळात सरदार/ सैनिक २६ ऑक्टोबर १६७२ पासून स्वराज्य जीवन वाहिले होते.

### स्वराज्याचे सरनोबत :-नुरबेग

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निष्ठावंत मुस्लिम सरदारांच्या ऐतिहासिक कर्तबगारीचा मागोवा घेत असताना आपल्या डोळ्यासमोर चटकन नाव येते ते मराठी स्वराज्याच्या पहिल्या सरनौबताचे ते म्हणजे नूर बेगचे, ते जातीने मुस्लिम असले तरी नुरबेग हे स्वराज्यासाठी तळहातावर शिर घेऊन लढले होते. शिवरायांच्या सैन्याचा प्रमुख होता. सैन्याच्या प्रमुखाला सरनोबत म्हणत असत. तत्कालीन लढायांचा विचार करता महाराजांचा सरनोबत हा एक मुस्लिम होता. घोडदळात मुस्लिमांना प्राधान्य होते. कारण मुस्लिम सैनिक आपल्या धर्मापेक्षा अन्नदात्या धन्यावरच निष्ठा ठेवून नोकरी बजावत असत.

**:- शमाखान सरदार:-**स्वराज्याच्या घोडदळातील सरदार होता. घोडदळात अनेक कर्तबगार मुस्लिम सरदार होते. त्यांनी स्वराज्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावली होती. अशाच एका सरदाराचा उल्लेख बकरी मध्ये येतो तो म्हणजे शमाखान होय.

### स्वराज्याचा तोफखाना प्रमुख.

**इब्राहीम खान:-**स्वराज्यात तीनशेच्या आसपास किल्ले होते. डोंगरी किल्ल्याच्या लढाईमध्ये तोफखान्याचे अतिशय महत्त्वाचे स्थान होते. तोफखाना म्हणजे विजयाची हमखास खात्री होती. तोफखण्यामुळेच आणि अजिंक्य किल्ले सर करता आले. तोफखाण्यासाठी लागणाऱ्या

छोट्या तोफा फ्रेंच व डच यांच्या जहाजावरून महाराजांना मिळत असत. तोफा किल्ल्यावर ठेवून तोफा डागणारे गोलंदाज हे किल्ल्यावर असत. आणि ते सर्व मुस्लीम होते. शिवाजीच्या तोफखान्याचा प्रमुख एक मुसलमान होता. त्याचे नाव इब्राहीमखान होते. तोफखाना लष्कराचे प्रमुख अंग होते. यावरून शिवरायांचे धोरण स्पष्ट होते की ते मुस्लिमांचे शत्रू नव्हते.

**सिद्धी इब्राहिमः -**हा शिवरायांच्या मुस्लीम अंगरक्षक होता. अंगरक्षकांनी आपल्या धन्याचा घात केल्याच्या घटना इतिहासात अनेक आहेत. या मुद्द्यावर लक्ष केंद्रित केल्यास शिवाजीचा अंगरक्षक एक मुसलमान होता. ही गोष्ट इतिहासाला नवे वळण देणारी असून ज्यांच्याविरुद्ध लढाई करायची ते मुसलमान महाराजांचे अंगरक्षक होते तर ज्यासाठी लढायचे ते स्वकीय ब्राह्मण, मराठे त्यांच्याच विरोधात त्यांच्यावर शस्त्रे चालवितात. मुसलमानांची वकिली करतात शिवाजीला पराभूत करता यावे म्हणून कोटी चंडी यज्ञ करतात. ह्या गोष्टी मोठ्या विलक्षण वाटतात यावरून शिवरायांची लढाई धर्मासाठी किंवा जातीसाठी नव्हती तर सर्वांना समान संधी. समान दर्जा. सर्वांना न्याय., समता,स्वातंत्र्य लोककल्याण प्रदान करण्यासाठी लोकशाही शासन व्यवस्थेच्या स्थापनेसाठी होती.

**मदारी मेहतरः-**महाराजावरुन जीव ओवाळून टाकणारा अंग रक्षक होता. महाराजांच्या व्यक्तिगत अंगरक्षका पैकी हा मदारी मेहतर फार महत्त्वाचा सेवक होता. आग्र्याच्या कैदेत असताना स्वतः जीव धोक्यात घालून महाराजांची सुटका करणारा मदारी मेहतर वयाने कोवळा, असून परंतु स्वामीनिष्ठेचा आदर्श नमुना ठरावा असा मुस्लिम युवक होता. मदारी ची स्वामीनिष्ठा प्रकाश झोतात आणणारी आग्र्याच्या सुटकेची कथा फार प्रसिद्ध आहे. मदारी मेहतर हा शिवरायांचा खास विश्वासातला जीवास जीव देणारा सेवक होता.

**काझी हैदरः-**शिवरायांचा वकील होता. शिवराय हे उत्तम गुणग्राहक असून चांगल्या चांगल्या हुशार माणसांना ते आपल्या सेवेत ठेवत असत. शिवरायांच्या पदरी असलेला काझी हैदर हा फारसी भाषेचा पंडित होता. शिवरायांनी त्याला खास सचिवपदी नेमले होते. शिवरायांच्या आरमारातील मुस्लिम सैनिक निष्ठावंत होते. सागराचे महत्व ओळखून इ.स.१६६० ते ६२ च्या दरम्यान महाराजांनी आरमार बांधणी केली. शिवाजी महाराजांनी आरमार प्रमुख म्हणून दर्या सारंग व मायनाक भंडारी यांना नियुक्त केले होते. स्वराज्यात अनेक मुस्लीम अधिकारी होते. योग्य पात्रता असणाऱ्यांची महाराजांनी आरमारासाठी निवड केली होती. त्यापैकी बहुतेक मुस्लिम सरदार कसोटीला उतरून त्यांना नाविक दलातील महत्त्वाच्या जागा देण्यात आल्या होत्या. ठाण्यातील गोलंदाजपासून आरमाराच्या सर्वोच्च अधिकारी शुभे दारापर्यंत मुस्लिमांना अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. दर्यासारंग फार मोठी कामगिरी केली होती.

**दौलत खानः-** **इ.स.** १६७४ च्या पूर्वीच मराठा आरमाराचा प्रमुख असावा कारण १६७४ मध्ये सिद्धी संबुळने दौलत खानावर स्वारी केली, तेव्हा तो मराठा आरमाराचा प्रमुख होता.

**दाऊदखानः-**दाऊद खान हा मराठ्यांच्या आरमाराचा सुभेदार होता.

**सिध्दी मिस्त्रिः-**इ. इत्यादी अनेक मुस्लीम अधिकाऱ्यांनी पराक्रम करून विजय श्री खेचून आणली होती शिवरायांचे आरमार आणि मुस्लिमांची स्वामिभक्ती स्वराज्याची एकनिष्ठता त्यांचे पराक्रम पाहून शिवाजीराजे हे मुस्लिमांच्या विरोधी नव्हते हेच यावरून सिद्ध होते. आणि मुस्लीम सैनिक हे कधीही फितूर झाले नाही. या उलट मराठे, ब्राह्मण हेच फितूर होत असत. असे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१)देशमुख मा.म. मध्ययुगीन भारताचा इतिहास.
२) हनुवते प्रेम. शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक
३) बेंद्रे वा.सि. शिव चरित्र.
४) सय्यद अमीन , महापुरुष शिवाजी महाराज.
५) कुलकर्णी भीमराव (संपा) सभासद बखर.